महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय
माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१
ई-मेल– doesecondary1@gmail.com
फोन नं. ०२०-२६१२०३६१

**परिपत्रक**

क्र.शिसं/माध्य/एस-४/स्वयंअर्थ/ऑनलाईन/२०२२-२३/एस-४/ 4८८८
दिनांक- ०६/०९/२०२२
०७

प्रति,

१. अध्यक्ष,
क्षेत्र स्तरीय प्राधिकरण, तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व विभाग

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
जिल्हा परीषद, सर्व

३. शिक्षण निरीक्षक,
बृहन्मुंबई (उ.प.द.)

**विषय :** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० मधील तरतूदीनुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी खाजगी संस्थांकडून ऑनलाईन प्रस्ताव मागविण्याबाबत

**संदर्भ:**
१. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ दि.१९/०१/२०१३
२. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० दि.०५/१०/२०२०
३. शासन पत्र क्र.एसएफएस-१०२२/प्र.क्र.१९२/एसएम-२ दि.१२/०७/२०२२
४. शासन पत्र क्र.एसएफएस-१०२२/प्र.क्र.१९२/एसएम-२ दि.३०/०८/२०२२ नुसार मा. सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांचेकडील दि.०५/०९/२०२२ रोजीची बैठक
५. मा. आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयाचे पत्र क्र. आशिका/२०२२/स्वयंअर्थ/आस्था-क १४३/५३७० दि.०६/०९/२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन विषयांकित अधिनियमाअंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० मधील नियम ३ (१) नुसार शाळा मान्यतेसाठी अर्ज करण्याकरीता ऑनलाईन संगणकिय प्रणाली (पोर्टल) तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार सर्व माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक याप्रकारच्या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी शासनाकडून इरादापत्र मिळणेसाठी ऑनलाईन पध्दतीने https://mahasfs.org या संकेतस्थळावर नियमित अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच संस्थेस ऑनलाईन इरादापत्र मिळाल्यानंतर शासन मान्यता पत्र मिळणेसाठी याच संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

यास आपल्या स्तरावरुन सूचना फलकावर प्रसिध्दी दयावी व सदरची बातमी विनामुल्य आपल्या स्तरावरुन स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात यावी. ऑनलाईन संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

उपरोक्त अधिनियमातील नियम ९ नुसार क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे व नियम १२ नुसार राज्य स्तरीय प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम ९ नुसार गठित करण्यात

आलेल्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाद्वारे, इच्छुक शैक्षणिक संस्थांकडून उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांची नियमानुसार छाननी करुन ऑनलाईन Approve / Reject करण्याची कार्यवाही करावी.

क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडून इरादापत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव ऑनलाईन थेट शासनाकडे जातील व शासनस्तरावरुन ऑनलाईन इरादापत्र संस्थेच्या लॉगिनवर उपलब्ध होईल. इरादापत्र मिळाल्यानंतर शासन मान्यता मिळणेसाठीचे प्रस्ताव ऑनलाईन क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडून राज्य स्तरीय प्राधिकरणास पाठविले जातील व राज्य स्तरीय प्राधिकरणाकडून सदर प्रस्ताव शासन मान्यता पत्र मिळणेस्तव शासनास पाठविणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

शासन निर्देशानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार सदर बाबत प्रभावी अंमलबजावणी करिता आवश्यक ती सर्व उचित कार्यवाही करण्यात यावी.

**(महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय,म.रा.,पुणे १.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. नोंदणी महानिरीक्षक, तथा सदस्य, राज्य स्तरीय प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, पुणे-४११००१
३. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), तथा सदस्य, राज्य स्तरीय प्राधिकरण, पुणे-१

D:\SFS paripatrak\online\2022\